# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-28.08.2026** **वार- शुक्रवार**

---

**सण**

बहीण भावाचं पवित्र नातं जपणारा रक्षाबंधनाचा सण आज सर्वत्र साजरा होत आहे. आकर्षक आणि वैविध्यपूर्ण राख्यांनी पुणे आणि उपनगरातील बाजारपेठा सजल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रक्षाबंधना निमित्त राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत.

**जवानांसाठी राख्या**

जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्रीमती लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्त मंदिर ट्रस्टच्या वतीनं पुण्यातून पाच हजार राख्या पाठवण्यात येत आहेत.

**राष्ट्रीय क्रीडादिन**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त उद्या पुण्यात विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा २०२६ या विषयावर आधारित विशेष आवरणाचं प्रकाशन करण्यात येणार आहे. डेक्कन जिमखाना क्लबमध्ये सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री तसंच महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते विशेष आवरणाचं प्रकाशन होईल.

**विमुक्तजाती दिन**

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाच्या वतीनं विमुक्त जाती दिनानिमित्त राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. हा कार्यक्रम येत्या सोमवारी ३१ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता फर्ग्युसन महाविद्यालयात होणार आहे. ब्रिटिश राजवटीत काही जाती-जमातींना गुन्हेगार म्हणून घोषित करण्यात आलं होतं. स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी या जाती-जमातींवरील हा कलंक दूर करून त्यांना ‘विमुक्त जाती’ म्हणून घोषित करण्यात आलं. या ऐतिहासिक दिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी ३१ ऑगस्ट हा ‘विमुक्त जाती दिन’ म्हणून साजरा करण्यात येतो.

**साखर निर्बंध**

केंद्र शासनाच्या साखर साठा निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभागानं साखर विक्रेते, वितरक आणि मोठ्या ग्राहकांसाठी साठा मर्यादेबाबत सूचना जारी केल्या आहेत. साखर विक्रेते आणि वितरकांना कोणत्याही वेळी किंवा कोणत्याही ठिकाणी चारशे मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखरेचा साठा ठेवता येणार नाही. तसंच, साखर प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांपेक्षा अधिक काळ साठा ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे.

दरमहा दहा मेट्रिक टनांपेक्षा जास्त साखर वापरणाऱ्या मोठ्या ग्राहकांनाही साखर प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांपेक्षा अधिक काळ साठा ठेवता येणार नाही. साखरेच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी कालपासून विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे.

**पुणे मोहीम**
पुणे जिल्ह्यातही साखरेची अवैध साठेबाजी आणि कृत्रिम टंचाई रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनानं विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. जिल्हा आणि तालुकास्तरावर स्वतंत्र तपास पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**खते उत्पादन**
आगामी खरीप आणि रब्बी हंगामात शेतकऱ्यांना खतांचा सुरळीत पुरवठा व्हावा, यासाठी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाने मिश्र खतांचं उत्पादन वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना आवश्यकतेनुसार खत उपलब्ध होण्यास मदत होईल, असा विश्वास कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुण्यात व्यक्त केला.

**PMPML**
पुणे महानगर परिवहन महामंडळ कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या नियमांप्रमाणे निवृत्ती वेतन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे स्थायी समिती सभापती आणि संचालक अभिषेक बारणे यांनी, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार येत्या सहा महिन्यांत कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाचे  सर्व लाभ देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. औद्योगिक न्यायालय आणि त्यानंतर उच्च न्यायालयानं कर्मचाऱ्यांच्या बाजूनं निकाल दिल्यानं  कर्मचाऱ्यांच्या २९ वर्षांच्या प्रदीर्घ लढ्याला यश आलं आहे.

**उमाजीनाईक स्मारक**
आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांचं स्मारक उभारण्यासाठी राज्य सरकारनं पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यीय समिती स्थापन केली आहे. या स्मारकाच्या उभारणीबाबत प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी या समितीवर सोपविण्यात आली आहे. हे स्मारक पुणे जिल्ह्यातील दिवे इथं उभारण्यात येणार आहे.

**अटक**
पुणे शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या तीन बांगलादेशी नागरिकांना पुणे पोलिसांच्या विशेष शाखेनं आणि लष्करी गुप्तचर विभागानं संयुक्त कारवाईत काल ताब्यात घेतलं. या तिघांवर स्थानबद्धतेची कारवाई करण्यात येत आहे.

**शर्वरी माने**
पुण्यातील युवा फुटबॉलपटू शर्वरी माने हिची उझबेकिस्तानमध्ये होणाऱ्या आगामी आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामन्यांसाठी भारताच्या १७ वर्षांखालील महिला राष्ट्रीय फुटबॉल संघात निवड झाली आहे.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज आकाश ढगाळ होतं. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी पडल्या. उद्या देखील अशाच प्रकारचं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**